सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, निर्णय क्र. समुप-२०१३/प्र.क्र.५(भाग-३)/का-१०, दि. १६/०५/२०२५.

**विषय :-** राज्यातील पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, निर्णय क्र. समुप-२०१३/प्र.क्र.५(भाग-३)/का-१०, दि. १६/०५/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०५१६१२३२५५११३० असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 20-05-2025 17:51:04

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह).

प्रत,
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक , कायदा व सुव्यवस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कायदा व सुव्यवस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक, कायदा व सुव्यवस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यातील पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-३)/का-१०**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक- १६ मे, २०२५.

**संदर्भ**:-

१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००१/प्र.क्र.६८/का-२, दि.१६.०८.२००१,
२) महिला व बाल विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२००१/प्र.क्र.६८/का-२, दि.१६.०८.२००३,
३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१२/प्र.क्र.१९/का-१०, दि.२७.०६.२०१२,
४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५/का-१०, दि.०४.०१.२०१४,
५) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-२)/का-१०, दि.१७.१०.२०१४,
६) महिला व बाल विकास विभाग, शासन पत्र क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-३)/का-१०, दि.०६.०३.२०२५.

**प्रस्तावना**-

राज्यस्तरीय प्रकल्प सुकाणू समितीचे अध्यक्ष तथा अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारास आळा घालण्यासाठी पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गठित राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या दि.२०.०२.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**-

राज्यामध्ये स्थापन करण्यात आलेल्या एकूण १४३ महिला समुपदेशन केंद्रांपैकी **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद ०९ स्वयंसेवी संस्थांना त्यापुढे नमूद केलेल्या जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी / पोलीस स्टेशनच्या आवारात समुपदेशन केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली पोलीस स्टेशनच्या आवारातील कौटुंबिक महिला जागृती सेवाभावी संस्थेस संदर्भाधीन क्र.३ येथील दि.२७.०६.२०१२ च्या शासन निर्णयान्वये तसेच नागपूर जिल्ह्यातील उमरेड पोलीस स्टेशनच्या आवारात रुबी सोशल वेल्फेअर सोसायटी, पीली स्कुल दरबार रोड, बडा ताजबाग,

नागपूर या संस्थेस संदर्भाधीन क्र.५ येथील दि.१७.१०.२०१४ च्या शासन निर्णयान्वये समुपदेशन केंद्र स्थापन करण्यास देण्यात आलेली मान्यता रद्द करण्यात येत आहे.

३. समुपदेशन केंद्रातील समुपदेशक हे मानधनावरील कर्मचारी असल्याने त्यांचे स्वयंमूल्यनिर्धारण करण्याची आवश्यकता नाही. तथापि, पोलीस अधीक्षक यांनी समुपदेशन केंद्रातील समुपदेशकांच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेऊन, समुपदेशकांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची नियुक्ती रद्द करुन इतर समुपदेशकाची नियुक्ती करण्याबाबत संबंधित संस्थेस जिल्हा समितीमार्फत कळवावे.

४. सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांसाठी संदर्भाधीन क्र.५ येथील दि.१७.१०.२०१४ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे लागू राहतील.

५. सदर केंद्रांना आवश्यक जागा, फर्निचर, टेलिफोन, स्टेशनरी व इतर मुलभूत सुविधा संबंधित पोलीस स्टेशनने उपलब्ध करुन द्याव्यात. सदर समुपदेशन केंद्राकरीता लागणाऱ्या खर्चाचा तपशील संदर्भाधीन क्र.१, २ व ४ येथील अनुक्रमे दि.१६.०८.२००१, दि.१६.०८.२००३ व दि.०४.०१.२०१४ मधील शासन निर्णयात विहित केल्यानुसार राहील.

६. सदर समुपदेशन केंद्र तात्काळ कार्यान्वित करण्याबाबतची कार्यवाही संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी करावी व सदर समुपदेशन केंद्र कार्यान्वित झाल्याबाबत पोलीस अधीक्षक यांनी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना अहवाल सादर करावा.

७. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी सदर समुपदेशन केंद्र कार्यान्वित झाल्याबाबत व त्यांच्या कामकाजाबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा.

८. पोलीस स्टेशनच्या आवारात कार्यरत महिला समुपदेशन केंद्रातील समुपदेशक सामाजिक कार्य शाखेतील पदव्युत्तर पदवी अर्हताप्राप्त (MSW) असावेत. तसेच, सदर समुपदेशकांचे मानधन संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याने त्या समुपदेशकाच्या स्वत:च्या नावे असलेल्या बँक खात्यात सरळ जमा (DBT) करण्याबाबत दक्षता घ्यावी. म्हणजे मानधनाची रक्कम स्वयंसेवी संस्थेमार्फत अदा करण्यात येऊ नये. मात्र इतर अनुज्ञेय प्रशासकीय खर्च स्वयंसेवी संस्थेला अदा करण्यात यावा.

९. संबंधित संस्थेने सदर समुपदेशन केंद्रावर दर्शनी भागात खालीलप्रमाणे फलक लावावा. (सदर फलकावर संस्थेचे नाव नसावे.)

“महिला समुपदेशन केंद्र,
(महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांची मान्यता प्राप्त)”

१०. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना या योजनेसाठी नियंत्रक अधिकारी तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आयुक्तांनी सदरची रक्कम संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना वितरीत करावी व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी ती रक्कम कोषागारातून आहरीत करुन संबंधित संस्थांना आवश्यकतेनुसार वितरीत करावी. संबंधित संस्थांनी प्राप्त झालेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate)तसेच इतर आवश्यक माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना वेळोवेळी सादर करावी व त्यांनी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना सादर करावी आणि आयुक्तांनी त्यांचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा.

११. यावरील होणारा खर्च मागणी क्रमांक एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०३, महिला कल्याण, (२१) (०१) महिला समुपदेशन केंद्रे (२२३५ ३१७७), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१२. सदर शासन निर्णय राज्यस्तरीय प्रकल्प सुकाणू समितीचे अध्यक्ष तथा अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारास आळा घालण्यासाठी पोलीस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गठित राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या दि.२०.०२.२०२५ रोजी आयोजित बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०५१६१२३२५५११३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL DEORAO SARDAR

Digitally signed by SUNIL DEORAO SARDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=778B75C2C14BADBE6832D77601CF425AA7979B907650965C83919DBA7DC458C7, cn=SUNIL DEORAO SARDAR
Date: 2025.05.16 12:36:12 +05'30'

**( सुनिल सरदार )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. प्रधान सचिव, (व्यय) / (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१४. पोलीस उप महासंचालक (महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१५. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई,
१६. पोलीस महासंचालक, पोलीस मुख्यालय, मुंबई,

१७. विशेष पोलीस महानिरिक्षक (महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष), पुणे,
१८. सचिव, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई,
१९. संचालक, महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा,
२०. प्रबंधक, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई,
२१. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
२२. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, बांद्रा, मुंबई,
२३. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई,
२४. महाप्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२५. सर्व निबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई व खंडपीठ, नागपूर / औरंगाबाद,
२६. सर्व जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय,
२७. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
२८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२९. राज्य समन्वयक (PPMU), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
३०. सर्व पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक,
३१. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), मुंबई,
३२. महालेखापाल, महाराष्ट्र २ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), नागपूर,
३३. उप आयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
३६. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
३७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३८. सर्व मंत्रालयीन विभाग,
३९. सर्व अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
४०. समन्वयक, महिला व बालकांचा विशेष कक्ष, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, देवनार, मुंबई,
४१. परिशिष्ट-अ मधील सर्व स्वयंसेवी संस्था (आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांच्यामार्फत),
४२. सर्व महिला समुपदेशन केंद्र / सेवा पुरविणारे / सर्व आश्रयगृहे (आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्यामार्फत),
४३. निवड नस्ती/का-१०.

**शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-३)/का-१०, दि.१६ मे, २०२५ चे**

**"परिशिष्ट-अ"**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका/ पोलीस स्टेशनचे नाव | समुपदेशन केंद्रास मान्यता देण्यात आलेल्या संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | पालघर | वसई | अस्तित्व सामाजिक संस्था, जी-२, मिरांडा मॅन्शन, जानकी टॉकीजच्या मागे, पारनाका, वसई, जि.पालघर. |
| २ | सातारा | कराड | ज्ञानदिप राष्ट्रीय सामाजिक व शैक्षणिक विकास संस्था, ओंड, ता.कराड, जि.सातारा. |
| ३ | अहमदनगर | कर्जत- जामखेड | शाहु महाराज बहुउद्देशिय सेवाभावी संस्था व शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी, ता.आष्टी, जि.बीड |
| ४ | नंदुरबार | नंदुरबार (तालुकास्तर) | संस्कृती बहुउद्देशिय सेवा मंडळ, नंदुरबार, ७१, प्रशांत नगर, हनुमंत पेट्राल पंपाशेजारी, कोरीट रोड, नंदुरबार, जि.नंदुरबार |
| ५ | बुलढाणा | चिखली | कृषी समृध्दी मल्टीपर्पज फाऊंडेशन, ता.जि.बुलढाणा |
| ६ | नागपूर | उमरेड | प्रयास बहुउद्देशिय संस्था, राऊळगांव, ता.काटोल, जि.नागपूर. |
| ७ | अमरावती | मोर्शी | संघर्ष सामाजिक संस्था, नारायण नगर, अमरावती. |
| ८ | वर्धा | हिंगणघाट | शांताबाई महिला बहुउद्देशिय ग्रामिण विकास संस्था, रोठा, ता.जि.वर्धा |
| ९ | | कारंजा | स्व. लक्ष्मणराव गोमासे शिक्षण संस्था घोराड, ता.सेलु, जि.वर्धा |

SUNIL DEORAO SARDAR

Digitally signed by SUNIL DEORAO SARDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=778B75C2C14BADBE6832D77601CF425AA7979B907650965C83919DBA7DC458C7, cn=SUNIL DEORAO SARDAR
Date: 2025.05.16 12:36:34 +05'30'

( सुनिल सरदार )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन